मुख्य कार्यालय विरार
विरार (पु)
ता. वसई, जि. पालघर – 401305

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

जावक क्र. वविशम/आस्था/ ७६० /2022
दिनांक २०/०७/२०२२

## जाहिर सुचना

वसई विरार शहर महानगरपालिका , मुख्यालय विरार येथे विधी विषयक कामांसाठी विधी विषयक सखोल ज्ञान असलेल्या विधी संवर्गातील सेवानिवृत्त मुख्य विधी अधिकारी श्रेणी-अ अधिकाऱ्यांमधुन करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता :-**

१. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विधी विषयक कामांसाठी विधी विषयक सखोल ज्ञान असलेल्या विधी संवर्गातील सेवानिवृत्त मुख्य विधी अधिकारी श्रेणी-अ संवर्गातील अधिकाऱ्यांमधुन मुख्य विधी अधिकाऱ्यांचे १ पद करार पद्धतीने भरावयाचे आहे.

२. सदर सेवानिवृत्त अधिकारी विधी संवर्गातील शासनाचे विधी विभागातुन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (महानगरपालिकेच्या गट- अ , ब व क ) मधील मुख्य विधी अधिकारी श्रेणी- अ या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३. सदर अधिकाऱ्यांस मराठी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

**अटी व शर्ती :-**

१. सदर नियुक्ती अकरा महिन्याचे कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

२. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस वसई विरार शहर महानगरपालिका येथे काम करावे लागेल.

५. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी आयुक्त तथा प्रशासक, आयुक्त व उप-आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवळी कामकाजाचा अहवाल सादर करतील.

६. उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

७. उमेदवाराने सदर पदाकरिता जाहिरातीच्या दिनांकापासुन आठ दिवसांच्या आत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार, विरार(पुर्व), ता.वसई, जि.पालघर -४०१३०५ या पत्यावर पोहोंचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना www.vvcmc.in या महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(अजिंक्य बगाडे)
अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय विरार येथे विधी विषयक सखोल ज्ञान असलेल्या विधी संवर्गातील सेवानिवृत्त मुख्य विधी अधिकारी श्रेणी-अ अधिकाऱ्यांमधुन करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत.

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडच्या काळातील स्वतःचे छायाचित्र येथे लावावे. |

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

२. अर्जदाराचा पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पद्धतीने नियुक्तीबाबत जाहिरात / सुचना मी काळजीपुर्वक वाचली असुन, सदर सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी